## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
**(सकाळ)**

जा.क्र.४२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०६/२०१७

**१) दुकानाचे लोखंडी शर्टस वाकवुन मोबाईल व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०१/०६/२०१७ ते ०२/०६/२०१७ चे ०४.३० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे राम मोबाईल नावाचे शिवाजी चौक पवनी येथील दुकानाचे लोखंडी शर्टस वाकवुन आत प्रवेश करुन १७ नवीन मोबाईल व नगदी ८०,६५०/-रु. असा एकुण २,१६,७४०/-रु. माल चोरुन नेल्याने फिर्यादी विजेन्द्र रामेश्वर काटेखाये वय २७ वर्ष, रा. घोडेघाट पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०१/०६/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपली मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ डब्लु ७२८८ किंमती ४०,०००/-रु. ची हिरो डिलक्स नंदलाल पाटील कापगते विद्यालय साकोलीचे आवारात गेटजवळ लॉक करुन लग्न कार्यक्रमा करीता गेला असता जेवन करुन मोटार सायकल जवळ आला असतांना मोटार सायकल ही दिसुन न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यादवराव शिवाजी कापगते वय ४३ वर्ष, रा. बोदरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) बिनापास परवाना अवैद्यरित्या ट्रक मध्ये रेती भरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०२/०६/२०१७ चे ०३.०० वा. यातील फिर्यादी हे आपले स्टॉपसह रात्र गस्त गुडमार्नीग करीत असतांना यातील आरोपी ट्रक चालकांनी ट्रक मालकाचे सांगण्यावरुन आपआपले ताब्यातील ट्रक ट्रकमध्ये एकुण २० ब्रास रेती किंमती ४०,०००/-रु. ची बिनापास परवाना चोरुन अवैद्यरित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. कुंभरे पोस्टे जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. जवाहरनगर येथे कलम ३७९,१०९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. पाटील पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैद्य मास साहित्यासह विक्री करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०२/०६/२०१७ चे १०.३० ते ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांची आज रोजी अवैद्य मास विक्री कारवाई करणेकामी डुटी लागली असतांना मुखबीर यांचे कडुन अवैद्य गौवंश जातीचे मास विक्रीची खबर मिळाल्याने यातील फिर्यादी व अधिकारी तसेच पोलीस स्टॉप सह आरोपी यांचे घरी छापा मारला असता घरी जनावरांचे अंदाजे ४० किलो मास, १ जुना लोखंडी तराजु, १ किलो वजन, ५०० ग्रॅम वजन, २ नग लोखंडी वापरते सुरे, १ प्लॉस्टीक टॅप, १ पोता, १ लाखंडी गोलाकार कुंदा, प्लास्टीकच्या काळया पिशव्या असा एकुण ४,८८५/-रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. अनील गणपत कावळे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्कुटीला मागेहुन धडक मारुन इसमास जखमी व त्याचे सोबत असलेली नातीन हिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी फुलचंद श्रीपद गिऱ्हेपुंजे वय ५२ वर्ष, रा. सावरी सोमलवाडा रोड हा आपले टिव्हीएस स्कुटी गाडीवर नातीण कुमारी रोमीका वय ३ वर्ष हीला बसवुन कुमार पेट्रोल पंप लाखनी मधुन स्कुटी मध्ये पेट्रोल भरुन एनएच ०६ रोडने येवुन सेलोटी फाटयाकडे इंडीकेटर देवुन वळण घेत असता मागेहुन भंडारा कडुन साकोली कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे स्कुटीला मागेहुन धडक देवुन फिर्यादी व त्याच्या नातीन हिस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन जुन्या वादावरुन भांडण करुन लोखंडी रॉडने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे ११.३० ते १२.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत कॅरम खेळण्याचे जुन्या वादा वरुन भांडण करुन आरोपी क्र. १ ने लोखंडी रॉडने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी शुभम रामदास शेंडे वय २१ वर्ष, लावेश्वर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**७) गोडाऊनचे ताले तोडुन आत प्रवेश करुन गुळाचे कट्टे चोरुन नेले व जातांना गोडाऊनला तसाच ताला लावुन ठेवल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे १४.०० वा. ते ०१/०६/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे गोडाऊनचे ताले तोडुन आत प्रवेश करुन त्यात ठेवलेले २७० गुळाचे कट्टे चोरुन नेले व जातांना चोरी माहीत होऊ नये म्हणुन त्याच ताल्या सारखे दुसरे ताले लावल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. गोबरवाही येथे कलम ४६१,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**८) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे ११.०० ते ११.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. गिऱ्हेपुजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**९) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे १०.४५ वा. दर. यातील मृतक बहीराम कुसन नेवारे वय ५५ वर्ष, रा. धांबेटेकळी याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे नेत असतांना मृतक हा रस्त्यात मरण पावल्याने वैद्यकीय अधीकारी सामान्य रुग्नालय भंडारा यांनी त्यास चेक करुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. भंडारा येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला आणुन पेश केल्याने सरतर्फे फिर्यादी पो.शी. गभणे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**१०) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, सिहोरा व पवनी येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु किंमती ९००/–रु. ३ लिटर ३२० मिली लिटर विदेशी+ बिअर किंमती १२००/–रु. असा एकुण किंमती २१००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

03.6

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.